# उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, अचलपूर यांचे कार्यालय

क्र.अका/भू.सं./रा.म.मा.३५३j/कावी-१०३०/१९ दिनांक २७/१२/२०१९

**नमुना-१**

**खाजगी क्षेत्रातील जमीन वाटाघाटीने व थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेण्यासाठी जमीन मालक किंवा हितसंबधीत व्यक्तीकडून हरकती/सुचना मागविण्याबाबत जाहीर नोटीस**

**(भूसंपादन प्रकरण क्रमांक ०५/४७/२०१८-१९ मौजा तोंडगाव ता.चांदूरबाजार जि.अमरावती)**

ज्याअर्थी, कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, अमरावती यांचे प्रस्ताव **पत्र क्र.४९७/PO३/२०१९ दिनांक १८/०२/२०१९** अन्वये अमरावती जिल्हातील **राष्ट्रीय महामार्ग क्र.३५३J मोर्शी-चांदूरबाजार- अचलपूर मौजा तोंडगाव ता.चांदूरबाजार** येथील महामार्गाचे दर्जोन्नतीचे कामाकरीता या सार्वजनिक प्रयोजनाकरीता राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ व शासन निर्णय, महसूल व वनविभाग क्र.संकिर्ण ०३/२०१५/प्र.क्र.३४/अ- मंत्रालय, मुंबई दिनांक १२/०५/२०१५ तरतुदीस अनुसरुन शासन निर्णय क्र. एल.क्यु.एन ०१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२ दिनांक २५/०१/२०१७ नुसार खाजगी क्षेत्रातील जमीन वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने केंद्रीय रस्ते व परिवहन मंत्रालय तर्फे कार्यकारी यंत्रणा, कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग विभाग, अमरावती यांचे नावे घेण्याबाबतचा प्रस्ताव उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, अचलपूर यांचेकडे सादर केला आहे.

ज्याअर्थी, मा.जिल्हाधिकारी, अमरावती यांचे पत्र क्र.म.अ./विभूसअ/कावी-३८८/२०१७ दिनांक १४/०८/२०१७ अन्वये उक्त प्रस्ताव संबधी उक्त शासन निर्णय दिनांक १२/०५/२०१५ व दिनांक ३०/०९/२०१५ आणि तदनुषंगिक शासन निर्णय, तसेच शासन परिपत्रक महसूल व वनविभाग, क्र.एलक्युएन/०१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२, दिनांक २५/०१/२०१७ प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिलेले आहे.

त्याअर्थी, आता

१. मी, संदीपकुमार श.अपार, उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, अचलपूर जि.अमरावती याव्दारे अनुसूची - एक मध्ये नमुद खाजगी क्षेत्रातील जमीन वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने, केंद्रीय रस्ते व परिवहन मंत्रालय तर्फे कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, अमरावती यांचे नावे घेण्याबाबत जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहे आणि प्रकल्पासाठी जमीन थेट खरेदी घेताना जिल्हास्तरीय समितीमार्फत भुसंपादन कायदा २०१३ मधील कलम २६ ते ३० च्या शेडयुल - एक च्या तरतुदीनुसार संबंधीत जमिनीसाठीचा परीगणित होणारा मोबदला निश्चित करण्यात येईल. संबधीत भुधारकांकडून शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे खाजगी जमीन वाटाघाटीव्दारे कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, अमरावती यांचे नावे खरेदी देण्यास स्वच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपुर्णता व अंतिमरीत्या स्विकारण्यास तयार असल्याबाबतची समतीपत्रे (विकल्प) मागवीत आहे.

२. संबधीत भुधारकांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर विहीत नमुन्यातील संमतीपत्रे (विकल्प) उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, अचलपूर किंवा कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, अमरावती यांचेकडे दाखल करावी.

३. संमतीपत्राचा (विकल्प) विहीत नमुना उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, अचलपूर किंवा कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, अमरावती यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध आहे. तसेच सदर नमुना या कार्यालयामार्फत कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, अमरावती यांचे मार्फत भुधारकांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

४. सदर प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या आराखड्याची प्रत उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, अचलपूर यांचे कार्यालयामध्ये व कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, अमरावती यांचे कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत भुधारकांना किंवा हितसंबधीत व्यक्तींना तसेच जनतेस निरीक्षणासाठी खुली ठेवण्यात आली आहे.

**(अनुसूची एक)**

**भूसंपादन प्रकरण क्रमांक ०५/४७/२०१९-२० मौजा तोंडगाव ता.चांदूरबाजार जि.अमरावती प्रकल्पाच्या आखणीमध्ये समाविष्ट (खरेदी घ्यावयाच्या) जमीनीचा तपशिल**

| अ.क्र. | गाव | स.नं./गट क्र. | ७/१२ प्रमाणे एकुण क्षेत्र (हे.आर) | पोटखराब क्षेत्र | खरेदी करावयाचे क्षेत्र (हे.आर |
|---|---|---|---|---|---|
| १ | तोंडगाव | ४८८ | १.६१ | ०.४८ | ०.१६ |
| **एकूण** | | | **१.६१** | **०.४८** | **०.१६** |

**दिनांक : २७/१२/२०१९**
**ठिकाण : अचलपूर**

उपविभागीय अधिकारी तथा अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, अचलपूर

**उपविभागीय अधिकारी तथा**
**भूसंपादन अधिकारी, अचलपूर**